# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २७/१०/२०२४ (रविवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने रूटमार्च

दिनांक २६/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मा. श्री. रमेश बरकते सा. उप विभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली निमखेडा, खात, कोदामेंढी आणि अरोली येथे सशस्त्र सेना बल च्या तुकडी सह रूटमार्च काढण्यात आला. त्यादरम्यान मतदारांना निर्भिड मतदान प्रक्रिया पार पाडण्याकरिता मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. रूट मार्च दरम्यान १ अधिकारी, १० अंमलदार तसेच १६ सशस्त्र सीमा बल चे जवान सहभागी होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर